## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०७/२०१७

**१)ऑन लाईन ट्रांजेक्शन करून इसमाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ०९/०५/२०१७ चे ०८.४४.ते ०९.३६ वा. दर. यातील फिर्यादी सतीश रमेश शहारे वय ६६ वर्ष रा. टाकळी पुर्नवसन याचे बॅक खाते स्टेड बॅक ऑफ भंडारा येथे असुन फिर्यादीच्या वडीलाचे मो. क्र. वर अज्ञात व्यक्तीने फोन करून तो बाद्रा येथील स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेतुन बोलत असल्याचे सांगुन जि.एस.टी. सदर्भात व्हेरीफिकेशन करिता फिर्यादी यांना त्यांच्या वडीलाचे एस.बी.आय. एटीएमचा १६ अंकी नंबर विचारून त्यानंतर ६ वेळा आरोपीने टप्या—टप्यातुन बॅक खात्यातुन एकुन ४९,९९६/रु ऑन लाईन ट्रांजेक्शन करून फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६(सी) (डी) आयटी अॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी कांरडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन लोखंडी रॉडने डावे कानावर व हातावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०९/०७/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील जखमी फिर्यादी राजकुमार गणपत पडोळे वय ४८ वर्ष रा. सिल्ली ने आरोपी मुलगा आशिक व पत्नी वनिता यांना 'तुम्ही मला न विचारता मुलीचे लग्न का करून दिले' असे म्हणुन बडबडत असता आरोपी क्र. १ नी तु फालतु का बडबड करतेस असे म्हणुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे डावे कानावर, डावे हातावर मारून गंभिर जखमी केले व आरोपी क्र. २ ची पत्नी वनिता हिने सुध्दा थापड बुक्यानी मारून खाली पाडले व शिवीगाळ करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) क्लिनर नौकराने ट्रकमधील नगदी पैसे व मोबाईलची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०९/०७/२०१७ चे ०१.३० ते ०५.४५ वा. दर. यातील आरोपी ट्रक क्लिनर याने ट्रक ड्रायव्हर फिर्यादीने ट्रक च्या कॅबिनमध्ये ठेवलेले नगदी १,३०,०००/—रु. व फिर्यादी चा १ व्हिआयडबलुओ कंपनीचा मोबाईल किंमती ८,०००/—रु. व ट्रक ची चाबी फिर्यादी याचे ताब्यातील क्लिनर आरोपी नौकराने चोरुन नेल्याने फिर्यादी नरेन्द्र मोतीराम बोरकर वय ३५ वर्ष, समता नगर नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३८१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) काळी पिवळी वाहन पलटी झाल्याने वाहनात बसलेले एकाचा मृत्यु व तिघे जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ९/०७/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहनाचे चाक सुरक्षीत आहेत की नाही याची खबरदारी न घेता ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन चालक बाजुचे मागील चाकाचे टायर फुटुन वाहन पलटी झाल्याने वाहनात बसलेले प्रवासी १) जीवन कारेमोरे २) मिराबाई कारेमोरे ३) राजेश बोरकर यांना डोक्यावर, पायावर दुखापत झाली. व सचिन रवीन्द्र कारेमारे वय ०४ वर्ष, यांचे डोक्याला गंभिर दुखापत होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रकाश गुनीराम मोहतुरे वय ५१ वर्ष, रा. गोडेगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१९४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५)मोटार सायकल स्लीप होवुन रोडवर पडुन त्याचे कपाडाला ओठाला, छातीला व हाताला मार लागुन जखमी झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे १७.१० वा. दर. यातील जखमी आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ डब्लु ९१२४ ने विजय सकरु शामकुवर वय ६५ वर्ष, रा. डोडमाझरी यांचेसह डबलसिट भंडारा वरुन नागपुर कडे जात असतांना त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवित असतांना त्याची मोटार सायकल अचानक स्लिप झाल्याने रोडवर पडल्याने त्याचे कपाडाला व ओठाला, छातीला व डावे हाताला मार लागुन जखमी झाल्याने जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा गिऱ्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकल निष्काळजीपणे चालवुन चारचाकी वाहनाला धडक मारून वाहनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन विरुध्द दिशेने समोरून येणाऱ्या स्विप्ट व्हीएफआय क्र. एमएच ३१/ डीसी ८८१४ ला धडक मारून वाहनाचे अंदाजे २५,०००/रु चे नुकसान केल्याने फिर्यादी प्रसाद नत्थु नगरे वय ३० वर्ष रा. पवनारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर , तुमसर , सिहोरा ,लाखनी व पवनी येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ७२ लिटर हातभट्टी दारु + ७० किलो सडवा + साहित्य कि.१०,६८०/–रु. व ०३ लिटर ६०० मि.ली. देशी दारु किमती. ११००/रु. असा एकुण किमती ११,७८० /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०९/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १७२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४७ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एम.एम. सिडाम)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.